


## आर्थिक खैरातीला कात्री लावा

रघुनाथ राजन यांनी १५ डिसेंबर २०११ रोजी 'बिझनेस स्टँडर्ड' व्याख्यानमालिकेतील तिसरे पुष्प गुंफताना भारतामधील भाववाढीच्या घोडदौडीमागचे कारण विशद करताना केलेले विवेचन लक्षात घेण्यासारखे आहे. त्यांच्या मते भारतामधील कृषिक्षेत्राच्या उत्पादकता वाढीचा वेग कमी राहिल्यामुळे ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्न पुरेशा वेगाने वाढत नाही ही एक मोठी समस्या बनली आहे. यावर उपाय म्हणून शेतीक्षेत्रासाठी विविध आर्थिक सवलती आणि कृषकाच्या उत्पन्नात थेट वाढ करणाऱ्या काही योजना सरकार गेली काही वर्षे राबवीत आहे. यामुळे कृषिक्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या लोकांच्या हातात खर्चासाठी अतिरिक्त क्रयशक्ती निर्माण होत आहे. परंतु अशा वाढीव खर्चाबरोबर तेवढ्या प्रमाणात उत्पादकतेच वाढ न झाल्यामुळे महागाई वाढते आहे.

२००८ साली अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या वित्तीय क्षेत्रात सुरू झालेल्या पेचप्रसंगाने जागतिक पातळीवर वित्तीय क्षेत्रामध्ये हाहाकार माजविला आणि अंतिमतः त्यामुळे जागतिक उत्पादनव्यवस्थेमध्ये अरिष्टाची लागण झाली. या प्रकाराला सुरुवात होऊन तीन वर्षांचा कालावधी उलटून गेला आणि सदर कालावधीत जगातील बहुतांशी राष्ट्रांनी आर्थिक अरिष्टाशी मुकाबला करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्नांची पराकाष्ठा केली तरी आर्थिक विकासाची गाडी रुळावर येऊ शकलेली नाही. या आर्थिक अरिष्टाची कारणमीमांसा करताना डॉ. रघुनाथ राजन यांनी अमेरिकेतील खालच्या उत्पन्नथरातील लोकांचे उत्पन्न अनेक वर्षे स्थिर राहिलेले आहे ही बाब उघड केली. अशा परिस्थितीत अमेरिकेतील राज्यकर्त्यांनी अशा लोकांच्या निवाऱ्याची प्राथमिक गरज भागविण्यासाठी त्यांना गृहखरेदीसाठी सुलभ पद्धतीने कर्ज देण्याचा अभिनव उपक्रम सुरू केला. अर्थात अशा रीतीने देण्यात आलेले कर्ज फेडण्याची कुवत संबंधित कर्जदारांकडे नसल्यामुळे वित्तीय संस्था डबघाईला आल्या आणि जागतिक पातळीवर आर्थिक अरिष्टाने डोके वर काढले. अशा रीतीने उत्पादक क्षेत्रातील विषम वाटपाच्या मूलभूत समस्येने वित्तीय क्षेत्रामध्ये अरिष्टाची निर्मिती केली असा युक्तिवाद डॉ. रघुनाथ राजन यांनी त्यांच्या 'फॉल्ट लाइन'



या पुरस्कारप्राप्त पुस्तकात केला आहे.

अमेरिकेत सुरू राहिलेल्या प्रक्रियेच्या स्वरूपाचा प्रकार भारतीय अर्थव्यवस्थेत सुरू आहे. यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत आर्थिक वाढीच्या प्रक्रियेचा धोका उत्पन्न होत आहे. ही समस्या निकालात काढण्याची लढाई दोन आघाड्यांवर लढणे क्रमप्राप्त ठरावे. यातील पहिली आघाडी म्हणजे शेतीक्षेत्रातील अतिरिक्त मनुष्यबळ अधिक उत्पादकता असणाऱ्या औद्योगिक क्षेत्राकडे वळविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न होणे गरजेचे आहे. म्हणजे औद्योगिकीकरणाला चालना द्यायला हवी. काही वर्षांपूर्वी अशी समस्या अनुभवणाऱ्या चीनने नगर आणि ग्रामउद्योग यांच्या विकासाला पद्धतशीरपणे चालना देऊन आर्थिक प्रगतीचा राजमार्ग खुला केल्याचे निदर्शनास येते. याचबरोबर भारताला चीनप्रमाणे शेतीक्षेत्रामध्ये उत्पादकता वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करायला हवेत. परंतु भारतातल्या राज्यकर्त्यांनी वरील मार्गांचा अवलंब करण्याऐवजी ग्रामीण क्षेत्रामधील उत्पादकता वाढविण्यासाठी कोणतेही प्रयास न करता ग्रामीण भारतात रोजगार हमी योजना, शेतमालासाठी हमी भाव निश्चित करणे यासारख्या योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागात अतिरिक्त क्रयशक्ती निर्माण करण्याचा मार्ग अवलंबिला आहे. यामुळे बाजारपेठेत वस्तू आणि सेवा यासाठी वाढीव मागणी निर्माण होऊन भाववाढीला चालना मिळत आहे. यामुळे नजिकच्या भविष्यात आर्थिक विकासाचा मार्ग खडतर बनण्याची शक्यता आहे.

डॉ. रघुनाथ राजन हे आजच्या आमच्या राज्यकर्त्यांप्रमाणे मुक्त आर्थिक व्यवस्थेचा पुरस्कार करणारे असले तरी त्यांचा सल्ला स्वीकारून गेली सहा-सात वर्षे सुरू असणारी खैरात करताना आमचे राज्यकर्ते आपला हात जरा आखडता घेतील असे वाटत नाही.

## अनिल अंबानी यांची अजब दास्ताँ




'युबीएस' बँकेच्या संदर्भात प्रकाशात आलेल्या एका घटनेने आपल्यासाठी अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. सदर घटनेनुसार भारतातील एक अग्रगण्य उद्योगपती अनिल अंबानी यांनी आपल्या दोन कंपन्यांसाठी परदेशात उभारलेले कर्ज भारतात सरळ मार्गाने आणण्याऐवजी 'पार्टिसिपेटरी नोट' या पद्धतीचा वापर करून आपल्या तिसऱ्या कंपनीत गुंतवणूक केली. हा सर्व व्यवहार बेकायदेशीर या सदरात मोडणारा ठरतो. अशाच पद्धतीने 'एचएसबीसी' या विदेशी बँकेच्या जिनिव्हा येथील शाखेत ७०० भारतीय नागरिकांची खाती असल्याची माहिती नुकतीच उघड झाली आहे. तसेच 'लायच्टेनस्टेन' यासारख्या इतर देशांमध्ये भारतीय नागरिकांनी ठेवलेल्या काळ्या धनाचा तपशील भारत सरकारला मिळाला आहे.

सर्वसाधारणपणे असे काळे व्यवहार जेव्हा उघड होतात तेव्हा बँका अशा गैरव्यवहारांमध्ये खापर बँक कर्मचाऱ्यांच्या माथ्यावर फोडतात. परंतु आता अशा कर्मचाऱ्यांनी आपला बचाव करताना संबंधित बँकांच्या वरिष्ठांशी अशा गैरव्यवहारांना सतत खतपाणी कसे घातले आहे हे साधार दाखवण्याचा प्रयास केला आहे. यामुळे भारतात कार्यरत असणाऱ्या विदेशी बँका बेकायदेशीर आर्थिक व्यवहार करण्यासाठी उत्सुक असणाऱ्या भारतीयांना तशी 'सेवा' पुरवण्यासाठी भारतात येतात काय असा प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी असेल तर भारत सरकार आणि रिझर्व बँक यांनी अशा बँकांच्या व्यवहारांवर सक्त नजर ठेवणे आणि त्यांचे व्यवहार भारतीय कायद्याच्या चौकटीचे उल्लंघन भारतातच नव्हे तर तर जागतिक पातळीवरही करीत नाहीत याची खातरजमा करणे आवश्यक ठरते. नुकतीच अमेरिकन सरकारने त्यांच्या नागरिकांनी टॅक्स चुकवून 'युबीएस' बँकेत जमा केलेल्या ४४५० धनकोंची यादी त्या बँकेस दबाव आणून प्राप्त करून घेतली आहे. भारत सरकारलाही असा प्रयत्न करणे अवघड ठरू नये कारण भारतात व्यवसाय करण्यासाठी विदेशी बँका आज उत्सुक आहेत.

अनिल अंबानी यांच्या कहाणीमुळे भारतातील नियंत्रकांच्या (regulators) संदर्भात एक मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कारण अनिल अंबानी यांनी बनावट कंपन्या स्थापन करून त्यांच्या माध्यमातून भांडवल बाजारात गुंतवणूक करून कायद्याचे उल्लंघन केल्याचे उघड होताच त्यांनी ५० कोटी रुपये भरून सिक्युरिटी अँड एक्स्चेंज बोर्ड यांच्याबरोबर समझोत्याचा करार करून जानेवारी २०११ मध्ये कायद्याच्या कचाट्यातून आपली सुटका करून घेतली. असे प्रकार अमेरिकेतही होतात. पण अलीकडच्या काळात अशा एका समझोत्याला तेथील न्यायालयाने हरकत घेतली आहे. भारताच्या संदर्भात विचार करायचा तर भारतातील काळा पैसा भारतीय नागरिक छुप्या मार्गाने प्रथम विदेशात नेतात आणि नंतर तो भारतीय भांडवल बाजारात गुंतवणुकीसाठी मॉरिशसच्या मार्गाने आणतात असा बोलबाला गेली अनेक वर्षे सुरू आहे. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे अशा व्यवहारांना आळा घालण्यासाठी सरकार वा रिझर्व बँक यांनी कोणतीही कृती केलेली नाही. नाही म्हणायला अपवाद म्हणजे सुमारे पाच वर्षांपूर्वी डॉ. वाय. व्ही. रेड्डी रिझर्व बँकेचे गव्हर्नर असताना पार्टिसिपेटरी नोट्सच्या माध्यमाद्वारे भांडवल बाजारात गुंतवणूक करण्यावर बंदी लादण्यात आली होती. पण २००८ च्या आर्थिक अरिष्टामुळे भारतीय भांडवल बाजार कोसळताच तो सावरण्यासाठी सदर बंदी उठविण्यात आली. थोडक्यात कोणत्याही मार्गाने आणि कोणाचाही पैसा भारतीय भांडवल बाजारात यावा यासाठी सरकार आतूर आहे. असे सरकार गैरव्यवहारांना आळा कसा घालणार?

उद्योगपती अनिल अंबानी यांचा जो गैरव्यवहार उघडकीला आला आहे तो सुमारे ८१० दशलक्ष डॉलर्स म्हणजे सुमारे ४००० कोटी रुपयांचा होता. या व्यवहारासाठी अंबानींना मदत करणाऱ्या युबीएस बँकेचे माजी अधिकारी सचिन कर्पे यांना इंग्लंडच्या न्यायालयाने १५ लाख पौंड दंड केला आहे आणि भारतात असा गैरव्यवहार करणारे अंबानी ५० कोटी रुपये भरून समझोता करून उजळ माथ्याने वावरत आहेत. एवढेच नव्हे तर पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी त्यांना सप्टेंबर २०११ मध्ये 'इंडिया चायना बिझनेस लीडर्स फोरम'चे भारताच्या बाजूचे सहसंचालकपद बहाल करून त्यांच्यावर विश्वास व्यक्त केला आहे. आणखी उल्लेखनीय बाब म्हणजे २जी स्पेक्ट्रम घोटाळ्यात अनिल अंबानी यांच्या रिलायन्स कम्युनिकेशन्सचे काही अधिकारी तिहार जेलची हवा अनुभवून आले आहेत. तेव्हा अनिल अंबानी यांच्यासारख्या उद्योगपतीवर मनमोहनसिंगच विश्वास करू जाणे. असा अजब प्रकार भारताबाहेर घडणे असंभवनीय वाटते.

## म्हणे शेतकऱ्यांच्या भल्यासाठी वॉलमार्टला पाचारण

किरकोळ बाजारात ५१ टक्क्यांपर्यंत परकीय थेट गुंतवणुकीला परवाना देण्याचा निर्णय संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने तूर्तास बासनात बांधून ठेवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. कारण या निर्णयाच्या विरोधात खुद्द आघाडीमधील तृणमूल काँग्रेस, द्रविड मुन्नेत्र कळघम या पक्षांनी कडाडून जाहीर विरोध केला हे आहे. आघाडीमधील अशा घटक पक्षांनी सत्ताधारी काँग्रेस पक्षाविरुद्ध नारे लावले हे चांगले झाले. कारण यामुळे आघाडी सरकार चालविताना घटक पक्षांची सहमती मिळविण्यासाठी काही प्रयत्न करणे गरजेचे ठरते, हा धडा काँग्रेस पक्ष शिकला तर भारतीय लोकशाही सबळ करण्याच्या दिशेने पडलेले हे पाऊल ठरेल.

जागतिक पातळीवर प्रचंड उलाढाल करणाऱ्या वॉलमार्ट, टेस्को यासारख्या किरकोळ व्यापारामध्ये कार्यरत असणाऱ्या कंपन्यांना आपल्या अर्थव्यवस्थेचे दार उघडून देण्यामुळे समाजाला आणि पर्यायाने भारतीय अर्थव्यवस्थेला होणाऱ्या लाभांचे सरकारने जे गुलाबी चित्र रेखाटले आहे ते वास्तवापासून पूर्णपणे फारकत घेणारे आहे. उदाहरणार्थ अशा कंपन्या थेट शेतकऱ्यांकडून भरपूर दाम मोजून शेतमाल खरेदी करून तो शहरी ग्राहकांना स्वस्त दरात देतील असा प्रचार सरकारी गोटामधून करण्यात आला आहे. तसे व्हायचे तर वॉलमार्ट या व्यापारी कंपनीला आपले रूपांतर धर्मादाय संस्थेमध्ये करावे



लागेल. तसे होणार असेल तर संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने क्रांती घडवून आणली असेच म्हणावे लागेल.

वास्तवात वॉलमार्टसारख्या मोठ्या कंपन्या किरकोळ व्यापाराच्या क्षेत्रात सक्षमपणे उतरतील तेव्हा त्यांच्या मक्तेदारी ताकदीमुळे त्या उत्पादकांची मुस्कटदाबी आणि ग्राहकांची लूट करतील हे अर्थशास्त्राच्या क्रमिक पुस्तकातील प्राथमिक स्वरूपाचे ज्ञान आहे. राज्यकर्त्यांना अर्थशास्त्राच्या सिद्धांतांची सहजपणे मोडतोड करून प्रचार करता येतो. पण प्रत्यक्ष व्यवहारात आर्थिक हितसंबंधाच्या अदृश्य हाताची किमया थोपविता येत नाही. हे त्रिकालाबाधित सत्य आहे. तेव्हा किरकोळ क्षेत्रामध्ये बहुराष्ट्रीय बड्या कंपन्यांचे आगमन झाल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालासाठी चांगला भाव मिळेल आणि ग्राहकांना स्वस्त दरात चांगला माल मिळेल असा विचार मूर्खांच्या नंदनवनात राहणारेच करू जाणे!

किरकोळ व्यापारात उतरणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी त्यांच्या एकूण गुंतवणुकीच्या ५० टक्के हिस्सा पायाभूत सुविधा म्हणजे गोदामांची उभारणी, शीतगृहांची निर्मिती यासाठी खर्च करावा असा दंडक सरकारने जारी केला आहे. तसे झाले तर खाद्यान्न म्हणजे विशेषतः फळे, भाज्या यासारख्या नाशवंत मालाची नासाडी थांबेल असा प्रचार सरकारी गोटामधून करण्यात आला आहे. वास्तवात प्रचार केला जातो तेवढ्या प्रमाणात म्हणजे सुमारे ४४ टक्के फळे आणि भाज्या यांचा नाश आजही होत नाही. तसेच वीस-पंचवीस वर्षांपूर्वी फळे आणि भाज्या अशी उत्पादने करंड्या आणि लाकडी खोके यामधून शहरात विक्रीसाठी आणण्याची पद्धत होती. आता त्यासाठी सर्रास प्लॅस्टिकचे क्रेट वापरले जातात. डिसेंबर-जानेवारी महिन्यात तयार होणारा बटाटा काढणी झाल्यावर लगोलग शीतगृहात हलविला जातो. त्यासाठी लागणारी शीतगृहे उभारण्यात आलेली आहेत. तेव्हा गोदामे आणि शीतगृहे उभारण्यासाठी वॉलमार्ट वा टेस्को यासारख्या कंपन्यांना पायघड्या घालून पाचारण करण्याची वास्तवात काहीच गरज नाही.

शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने विचार करायचा तर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अधिपत्याखालील मंड्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तेथील कारभार अधिक पारदर्शक करणे गरजेचे ठरते. उदाहरणार्थ मालाचा लिलाव झाल्यावर ठरणारा भाव रेल्वे इंडिकेटरप्रमाणे ठळक अक्षरात जाहीर करणे पारदर्शकता वाढवील. तसेच अशा मंड्यांमध्ये दिवसाच्या शेवटी ज्या भावात खरेदी-विक्री व्यवहार झाले ते त्या संध्याकाळी एफएम रेडिओद्वारे वा एसएमएसद्वारे शेतकऱ्यांना कळविण्याची व्यवस्था व्हायला हवी. अशी माहिती शेतकऱ्यांना मिळाली तर दुसऱ्या दिवशी बाजारात किती माल पाठवायचा याचा निर्णय शेतकऱ्यांना घेता येईल. थोडक्यात शेतकऱ्यांच्या भल्यासाठी सरकारला बरेच काही करता येण्यासारखे आहे. पण यातील कोणतीही गोष्ट न करता बहुराष्ट्रीय कंपन्या शेतकऱ्यांचे भले करतील असा भ्रम पैदा करून राज्यकर्ते आपले कर्तव्य करण्यात चुकारपणा करीत आहेत असेच म्हणावे लागते.

## अन्नसुरक्षा कायद्याच्या मसुद्याविषयी

होय-नाही करताना शेवटी अन्नसुरक्षा कायद्याच्या मसुद्याला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आणि हा नवा कायदा अस्तित्वात येण्याचा मार्ग मोकळा झाला. या नव्या कायद्यामुळे देशातील गोरगरीब लोकांमधील कुपोषणाची समस्या निकालात निघणार आहे काय? तर याचे ठोस होकारार्थी उत्तर देण्याचे धाडस कोणताही अभ्यासक करणार नाही. कारण आधीप्रमाणेच यापुढेही स्वस्त दरात धान्य मिळणाऱ्या कुटुंबांची विभागणी प्राधान्याचा हक्क असणारा गट आणि सर्वसाधारण गट अशा दोन विभागांत करण्यात येणार आहे. म्हणजे पूर्वीच्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे आणि दारिद्र्यरेषेवरील गरीब कुटुंबे यांच्या गणतीसारखाच हा प्रकार असणार आहे. तसेच प्राधान्यत्वाचा हक्क असणाऱ्या कुटुंबातील व्यक्तींना महिन्याला दरडोई सात किलो धान्य नाममात्र दराने मिळणार आहे, तर सर्वसाधारण गटातील व्यक्तींना महिन्याला दरडोई तीन ते चार किलो धान्य स्वस्त दरात मिळणार आहे. साधारण व्यक्तीला निर्वाहासाठी महिन्याला १४ किलो धान्याची गरज असते. एकदा ही गोष्ट विचारात घेतली की प्राधान्याचा हक्क असणाऱ्या गटातील व्यक्तीला तिच्या एकूण धान्याच्या गरजेपैकी अर्धा वाटा खुल्या बाजारातून खरेदी करावा लागणार आहे. सर्वसाधारण गटासाठी ही गरज ७५ टक्क्यांहूनही म्हणजे महिन्याला ११ किलो प्रति डोई एवढी जास्त राहणार आहे. त्यामुळे गोरगरीब जनतेला खुल्या बाजारातील महागाईची झळ पूर्वीप्रमाणेच लागणार आहे.

या नवीन कायद्यामधील सर्वात महत्त्वाची कमतरता म्हणजे

लाभधारक गटातील कुटुंबांचे प्राधान्यत्वाचा हक्क गट आणि सर्वसाधारण गट अशा दोन गटांत बिनचूक विभाजन कसे करायचे हा लाखमोलाचा प्रश्न अनुत्तरीतच राहणार आहे. कारण २०११ च्या आर्थिक आणि जातीविषयक जनगणनेनुसार अशी विभागणी करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्षात सुरेश तेंडुलकर समितीच्या शिफारसीनुसार लाभधारक गटातील कुटुंबांची दोन गटांत विभागणी केली जाण्याची शक्यता आहे. प्रत्यक्षात कोणतेही निकष वापरले आणि देशातील सुमारे २४ कोटी कुटुंबांची विविध गटांमध्ये विभागणी करण्याचे काम कितीही काटेकोरपणे करण्याचा घाट घातला तरी प्रत्यक्षात असे काम करताना काही चुका या होणारच. अशा चुकांमुळे प्राधान्यत्त्वाचा हक्क असणाऱ्या गटातील लोकांची गणना सर्वसाधारण गटामध्ये होऊन ते अधिकच्या आर्थिक लाभाला मुकले तर ती गोष्ट सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या दृष्टीने नोंद ठरेल. तसेच यामुळे देशातील कुपोषणाची समस्या निकालात निघणार नाही.

हे दोष टाळण्याचा एक सरळ आणि सुलभ मार्ग उपलब्ध आहे. तो म्हणजे लाभार्थी कुटुंबांचे दोन गटांत विभाजन न करता या कायद्यान्वये अन्नसुरक्षेवर खर्च करण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या एकूण धान्याचे सर्व लाभार्थींमध्ये समान वाटप करणे हा होय. तामिळनाडू आणि इतर काही राज्यांमध्ये अशा पद्धतीने सार्वजनिक वितरण व्यवस्था राबविली जाते. त्यामुळे तेथील प्रशासनाला त्या योजनेची अंमलबजावणी करणे सोईचे जाते ही बाब स्पष्ट झाली आहे. तेव्हा नवीन कायदा पास करताना कायद्याच्या मसुद्यात सुयोग्य बदल करून देशातील एकूण लाभार्थी कुटुंबे आणि लाभाची गरज नसणारी कुटुंबे अशा दोन गटांत विभाजन करणे प्रशासकीयदृष्ट्या सुलभ आणि सामाजिकदृष्ट्या गरजेचे ठरणार आहे.

वरील सुधारणांखेरीज देशातील सुमारे सहा ते साडेसहा लाख दुकानांद्वारे या योजनेची वेगळ्या पद्धतीने कार्यवाही होण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेकडे राज्य सरकारांनी सातत्याने लक्ष पुरविणे ही आवश्यक बाब ठरते. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात तसे होत नाही. त्यामुळे केंद्र सरकार आणि राष्ट्रीय सल्लागार समिती यांनी सर्व घटक राज्यांच्या गळी या योजनेचे महत्त्व उतरविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करायला हवेत. कारण जागतिक महासत्ता बनण्याची ईर्षा बाळगणारे राष्ट्र देशातील कुपोषणाच्या समस्येचा अंत करू शकत नसेल तर ती बाब ही निश्चितच लांछनास्पद म्हणावी लागेल.

●

**–अर्थपाल**

## ‘वाटसरू’चे प्रतिनिधी

- **अकोला** : डॉ. संतोष कायंदे, भ्र. ९४२१७४८७८२
- **औरंगाबाद** : डॉ. भारत गोरे, भ्र. ९४२२४७८०००
- **नंदूरबार** : दिलीप सोलंकी, भ्र. ९८८१८२४५०५
- **लातूर** : डॉ. उमाकांत जाधव, भ्र. ९४०५७५९८८८
- **धुळे/जळगाव** : प्रा. संदीप नेरकर, अमळनेर, भ्र. ९४२३४९४७८०
- **यवतमाळ/नागपूर** : प्रा. संदीप तुंडुलवार, नागपूर, भ्र. ९८९०२७५७९३
- **नांदेड** : प्रा. राजेंद्र इंगळे, भ्र. ९४२३३०५८२७
- **बीड** : प्रा. राजेश गायकवाड, भ्र. ९४२००३००५०
- **नाशिक** : प्रा. प्रशांत देशपांडे, भ्र. ९४२२७६०६०४
- **चिपळूण** : प्रा. विराज महाजन, भ्र. ९४२११४०७६७
- **सोलापूर** : प्राचार्य सीताराम गोसावी, भ्र. ९८५०१५६१६६
- **रायगड** : प्रा. व्यंकट खटके, भ्र. ९४२१२५३७१०